# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अभियोग संचालनालय कार्यान्वित करण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे महाराष्ट्र सरकारला निर्देश
- मराठवाड्यात अधिकाधिक उद्योग येण्यासाठी राज्यशासन प्रयत्नरत–उद्योगमंत्री डॉ उदय सामंत यांचं प्रतिपादन
- तरुण पिढीला अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांचे निर्देश
- सीबीएसईच्या दहावी तसंच बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ
- छत्रपती संभाजीनगर इथं आजपासून ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं आयोजन

आणि

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप–५४ सुवर्णपदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

****

नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अभियोग संचालनालय कार्यान्वित करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्य सरकारला दिले आहेत. काल यासंदर्भात झालेल्या बैठकीत शहा यांनी सात वर्षापेक्षा अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या प्रकरणात दोषसिद्धतेचं प्रमाण ९० टक्क्यांच्यावर नेण्याचे प्रयत्न करण्याची सूचना केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह अनेक अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. गृहमंत्र्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांना माहिती दिली...

***‘‘अतिशय सकारात्मक अशी ही बैठक झालेली आहे. आम्हाला चांगलं मार्गदर्शन यातनं मिळालेलं आहे. हे तिन्ही कायदे लागू करण्याच्या संदर्भात आता आम्ही अधिक वेगानं तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे सुरू केलेली आहे. त्या संदर्भात विशेषतः फॉरेन्सीक इन्फ्रास्ट्रक्चर जे आहे, ते आम्ही आता मोठ्या प्रमाणात तयार करतो आहोत. पुढच्या सहा महिन्यामध्ये हे कंप्लिट आमचं फॉरेन्सीक नेटवर्क तयार होईल. प्रत्येक पोर्टचे क्युबीकस तयार करून ते ऑनलाईन जोडण्याच्या संदर्भात आम्ही आता सुरूवात केलेली आहे. त्याची माहिती आम्ही दिली. पुढच्या सहा ते आठ महिन्यात हे काम देखील आम्ही पूर्ण करू. त्यामुळे कोर्टातली गर्दी देखील कमी होईल. प्रॉसिक्युशन विंगला ट्रेनिंग देऊन कमीत कमी वेळात केस कशी निकाली निघेल यासंदर्भातला प्रयत्न आम्ही करणार आहोत.’’***

****

नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यात अधिकाधिक उद्योग व्यवसाय यावेत यासाठी राज्य शासन वेगवेगळ्या सुविधा पुरवत असल्याचं, उद्योगमंत्री डॉ उदय सामंत यांनी म्हटलं आहे. सामंत यांनी काल नांदेड इथं उद्योग विभागाचा आढावा घेतला. नांदेड जिल्ह्यात हदगाव आणि मारतळा इथं औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी जागेचं आरक्षण करण्यात आलं आहे, तिथे लवकरच उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील असं सामंत यांनी सांगितलं.

नांदेड आणि यवतमाळ सह पाच विमानतळांचं लवकरच खाजगी कंपनीकडून शासन स्वतःकडे हस्तांतरण करणार आहे, अशी माहिती सामंत यांनी दिली.

दरम्यान, परभणी इथं भरवण्यात आलेल्या जिल्हा कृषी संजीवनी महोत्सवाचं उदघाटन डॉ. सामंत यांच्या हस्ते काल झालं, शेतकरी हा समाजातील अतिशय महत्त्वाचा घटक असून त्यांना काही कमी पडू दिलं जाणार नाही, अशी ग्वाही सामंत यांनी यावेळी दिली आहे.

****

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे काल नांदेड दौऱ्यावर आले होते. राज्याला लवकरच नवं वाळू धोरण दिलं जाईल, अशी माहिती बावनकुळे यांनी यावेळी दिली.

****

तरुण पिढीला अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश गृह तसंच अन्न आणि औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले आहेत. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पोलीस आयुक्तालयात कायदा सुव्यवस्थेच्या आढावा बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. महसूल कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांवर कोणतीही हयगय न करता कारवाईचे निर्देश पोलिस प्रशासनाला दिल्याचं, कदम यांनी सांगितलं. ते म्हणाले...

> ***''शाळांमध्ये कॉलेजेसमध्ये विद्यार्थी आज ड्रग्सच्या आहारी गेलेले दिसत आहेत, आणि त्याच्यावरती जर का आपल्याला कंट्रोल करायचं असेल तर शाळांमध्ये पोलिस प्रशासन असेल, शिक्षक असतील, विद्यार्थी आणि पालक अशा चारही घटकांना एकत्र घेऊन तिथं काही उपक्रम राबवले पाहिजेत, अशा देखील सूचना पोलिस प्रशासनाला आज मी दिल्या आहेत. महसूल कर्मचाऱ्यांवरती जे काही हल्ले होत आहेत त्याबाबतीमध्ये ग्रामीण भागामध्ये पोलिस प्रशासनाला देखील आजच मी सूचना दिलेल्या आहेत की कुठल्याही पक्षाचा असू द्या, त्या वाळू माफियावरती कारवाई झाली पाहिजे, त्याच्यामध्ये कुठलीही हयगय करायची नाही.''***

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई च्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा आजपासून सुरु होत आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रांवर सकाळी ९ वाजता पोहोचणं आवश्यक असून केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक उपकरणांना मनाई करण्यात आली आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ होत आहे. या संमेलनासाठी छत्रपती संभाजीनगरनजिक वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात विलासराव देशमुख साहित्यनगरी साकारण्यात

आली आहे. डॉ. भीमराव वाघचौरे हे संमेलनाध्यक्ष तर विजय राऊत स्वागताध्यक्ष आहेत. या दोन दिवसीय संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं दिला जाणारा कवयित्री लीला धनपलवार विशेष काव्य पुरस्कार, नांदेडचे कवी पी. विठ्ठल यांना जाहीर झाला आहे. ११ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा काल समारोप झाला. उत्तराखंडमध्ये हल्दवानी इथं झालेल्या या समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उपस्थित राहून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. खेळात विजय आणि पराभव होतच असतो, या स्पर्धेत पदक न मिळालेल्या खेळाडूंनी पुढच्या वर्षी होणाऱ्या स्पर्धेत पदक मिळवावं, असं आवाहन शहा यांनी केलं, ते म्हणाले...

> ***''सोलह हजार खिलाडी लगभग चार सौं पैंतीस खेलों मे खेले। कुछ जिते, कुछ हारे। हार और जीत उसका खेले से कोई मतलब नही। जीत का जसबा और हार से निराश न होना यहीं खेल का संदेश है। इसलिये जो जीते है और जो हारे है वो सभी खिलाडीयों को मै अनंत अनंत शुभकामनायें देता हूं। मेघालय मे आपके लिये एक और मौका है। अगली बार मेडल लेके आईये ऐसी मेरी सभी को बहोत बहोत शुभकामनायें।''***

पदकतालिकेत ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्यपदकांसह सेना दलाच्या संघाने पहिला क्रमांक पटकावला. ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७६ कांस्यपदकांसह सर्वात जास्त २०१ पदकं जिंकून महाराष्ट्राच्या संघाने दुसरा, तर ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्यपदकांसह एकूण १५३ पदकं जिंकून हरियाणा संघाने तिसरा क्रमांक पटकावला.

****

बीड इथल्या दिव्यानी मारुती जोगदंड या विद्यार्थिनीची लंडन अबॅकस चॅम्पियनशिप या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या जागतिक स्पर्धेत

दिव्यानीने पाच मिनिटांत १०० प्रश्न सोडवून विक्रम नोंदवला. तिला सर्वोत्कृष्ट जागतिक अबॅकस स्पर्धक मानद सायटेशन मिळालं आहे.

****

महाविद्यालयीन जीवनात आभासी विश्वातून येणाऱ्या प्रलोभनांपासून विद्यार्थ्यांनी सावध रहावं, असं आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या देवगिरी महाविद्यालयात 'सायबर गुन्हेगारीचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम' या विषयावरच्या व्याख्यानात त्या काल बोलत होत्या.

दरम्यान, चाकणकर यांनी काल जन सुनावणी घेतली. या सुनावणीत सर्व १५२ तक्रारी निकाली काढण्यात आल्या. कौटुंबिक समस्यांच्या ९६ पैकी १४ तक्रारींमध्ये समेट घडवण्यात आल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात लोदगा इथं बांबू लागवडीत योगदान देणाऱ्या पर्यावरण योद्ध्यांचा काल रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

****

श्री क्षेत्र तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिराची स्ट्रक्चरल ऑडिटनुसार कामं ठरवण्यापुर्वी देवस्थानाचे पुजारी, तुळजाभवानी मंदिर ट्रस्ट, स्थानिक आमदार यांच्यासोबत बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री विधिज्ञ आशिष शेलार यांनी काल मुंबईत ही माहिती दिली.

मंदिराच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार पुढील कामाची दिशा निश्चित केली जाणार असल्याचं ते म्हणाले.

****

बीड इथं मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थींच्या मागण्या मांडण्यासाठी काल जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. यावेळी फलकबाजी करत प्रशिक्षणार्थींनी आपल्या मागण्या मांडल्या. या आंदोलनामुळे काही काळासाठी जिल्हा परिषद कार्यालयातलं कामकाज विस्कळीत झालं होतं.

****

महाराष्ट्र शासनाचा पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग, धाराशिव जिल्हा प्रशासन आणि वॉटर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात गेल्या ४ तारखेपासून जल अभियान आणि जल स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. जिल्ह्यातील सर्व गावांसाठी खुली असून येत्या २८ फेब्रुवारी पर्यंत जलस्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्वनामांकन करता येणार आहे.

****

नांदेड महापालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेचे उपअभियंता तथा विभाग प्रमुख संघरत्न सोनसळे यांना नांदेड महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी निलंबित केलं आहे. शासकीय कामात दिरंगाईच्या कारणांवरून ही कारवाई करण्यात आली.

****

लातूर शहरात ७ ठिकाणी ७ दिवशी आठवडी बाजार भरवण्याचं नियोजन महानगरपालिके मार्फत करण्यात आलं आहे, आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी ही माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथला शिवाजीनगरच्या बहुप्रतीक्षित छत्रपती शिवाजीनगर भुयारी मार्गाचं आज सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार आहे.

****